# श्री व्यंकटेश महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शन संपन्न

बेस्ट बुक सप्लायर्स आणि श्री व्यंकटेश महाविद्यालय यांचे संयुक्त विद्यमाने श्री व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी येथे ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. ग्रंथालयाचे जनक एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेच्या पूजनाने सदर ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांच्या हस्ते करण्यात आले. ग्रंथ हेच आपल्या जीवनाला योग्य दिशा देतात त्यामुळे ग्रंथांशी केलेली मैत्री आयुष्य समृद्ध बनवते असे प्रतिपादन महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले. साधारणतः नऊशे ते हजार पुस्तके प्रदर्शनासाठी उपलब्ध होते यामध्ये क्रमिक, संदर्भ, स्पर्धा परीक्षा, कथा, कादंबरी व ग्रंथ असे विविध प्रकारचे पुस्तके प्रदर्शित करण्यात आली. प्रामुख्याने पीएमएच, न्यू एज, विले क्रेजी, प्रकाशनाच्या पुस्तकांचा समावेश होता. महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी व विद्यार्थिनींचा ग्रंथ प्रदर्शनास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सर्व पुस्तके दोन वर्षांमध्ये प्रकाशित झालेली पुस्तके होती यावेळी बेस्ट बुक्स सप्लायर्सचे प्रो. प्रा. श्री. तानाजी माने आणि त्यांचे सहकारी उपस्थित होते. ग्रंथालयाचे ग्रंथपाल श्री. एम. पी. केसरकर यांनी सदर ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन व नियोजन केले होते. त्यासाठी ग्रंथालय परिचर श्री. अजय वळवी, श्री. शशांक कवटगे व श्री. पी. एस. माने यांचे सहकार्य लाभले.


OFFICE